महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०६ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ११ मे २०२१ ते सोमवार १७ मे २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

काट्यावरुन चालणारी व्यक्ती ध्येयापर्यंत लवकर पोहचते कारण रुतणारे काटे पायाचा वेग वाढवतात

# मुंबई मनपाचे कोरोना व्यवस्थापन प्रेरणादायी

## नीती आयोगाकडून कौतुकाची थाप



**मुंबई (योगेश होळंब)-** देशात सुरु असलेल्या ऑक्सिजन हाहाकारावरून सर्वोच्च न्यायालयाने मुंबई मॉडेल दिल्लीत राबवण्याचा सल्ला केंद्र सरकारला दिला होता. आता नीती आयोगानेही मुंबई कोरोना व्यवस्थापनाचे कौतुक करत शाब्बासकी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे राज्यातील कोरोना व्यवस्थापनासाठी कौतुक केले होते. नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी ट्विट करत मुंबई महानगरपालिकेला कौतुकाची थाप दिली. त्यांनी ट्विट करून म्हटले आहे की, केंद्रीय पद्धतीने बेडचे वाटप, ऑक्सिजन साठवणुकीचा अंदाज, तसेच खासगी रुग्णालयांमध्येही बेडचे वाटप. त्यावर पाहणी करण्यासाठी डॅशबोर्ड, रुग्णांच्या तब्येतीचा पाठपुरावा करण्यासाठी वॉर रुम, कोरोना व्यवस्थापनातील मुंबईचे मॉडेल प्रेरणादायी आहे. ट्रेसिंग-टेस्टिंग-ट्रॅकिंग-ट्रीटिंग या चतु:सूत्री आधारित उपाययोजनांमुळे मुंबईतील कोरोना रुग्णसंख्या आटोक्यात आली. 'चेस द वायरस' उपाययोजनेचाही रुग्णसंख्या कमी करण्यासाठी फायदा झाल्याचा दावा पालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. कोरोना रुग्णसंख्या वाढत असलेल्या अंधेरी पश्चिम, अंधेरी पूर्व, वांद्रे, ग्रँट रोड, मुलुंड, गोरेगाव, मालाड, कांदिवली आदी भागांसह पालिकेच्या २४ विभागातील भागांमध्ये अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पालिकेने उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने 'चेस द वायरस' आणि 'ट्रेसिंग- टेस्टिंग- ट्रॅकिंग -ट्रीटिंग' या चतु:सूत्री आधारित उपाययोजनांचा समावेश आहे. याअंतर्गत बाधित रुग्णांच्या निकटच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध घेत संबंधित व्यक्तींचे अलगीकरण करणे, आवश्यकतेनुसार संशयितांच्या व बाधितांच्या कोविड वैद्यकीय चाचण्या करणे आणि लक्षणे असलेल्या बाधितांवर मेडिकल प्रोटोकॉलनुसार औषधोपचार करण्यात येत आहेत. त्यामुळे झपाट्याने वाढलेली रुग्णसंख्या तेवढ्याच वेगाने खाली आली, असे पालिकेच्या एका वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### १२ मेपासून नाशिकमध्ये कडकडीत लॉकडाऊन; महापालिकेचा निर्णय

**नाशिक (सतिश सोनावणे)-** लॉकडाउन सदृश्य कडक निर्बंध राज्यात असले, तरी कोरोनाचा प्रादुर्भाव आणि बाधितांची वाढ यावर अपेक्षित परिणाम झाला नसल्याचे चित्र दिसत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव राज्यातील अनेक जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागातही वेगाने होत असून,



कोरोनाबाधितांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आरोग्य सुविधांवर आधीच अतिरिक्त ताण येत असून, त्यात नव्या कोरोनाबाधितांच्या संख्येमुळे चिंतेत भर पडत आहे. त्यामुळे आता जिल्हास्तरावर कडक लॉकडाऊनचा निर्णय घेण्याकडे कल वाढला असून, नाशिक शहरातही लॉकडाउन लावला जाणार आहे. हा निर्णय १२ मेपासून लागू केला जाणार आहे. देशात आणि राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली असून, कोरोनाचा प्रादुर्भाव संसर्ग रोखण्यासाठी राज्य सरकारने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सुरूवातीला नाईट कर्फ्यू व नंतर संचारबंदी लागू केली होती.

### रत्नागिरी जिल्ह्यात ४५ वर्षांवरील लोकांना कोविडशिल्डचा दुसरा डोस

**मुंबई (दिपेश गोरिवले):** कोरोनाचा मोठ्या प्रमाणात रत्नागिरी जिल्ह्यात प्रादुर्भाव होत आहे. जवळपास दिवसाला ४५० पेक्षा रुग्णांची नोंद होत आहे. त्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे. त्यातच मृत्यूसंख्या वाढत असल्याने चिंतेत अधिक भर पडत आहे. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी कडक लॉकडाऊन करण्यात आले




आहे. तसेच कोरोनाविरुद्धचा लढ्यासाठी कोरोना लसीकरण करण्यात येत आहे. आता रत्नागिरीत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या लसीच्यासाठ्यामधून रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आज सोमवारपासून प्राधान्याने कोविडशिल्ड लसीच्या दुसऱ्या डोससाठी असणाऱ्या ४५ वरील पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे. ज्यांनी कोविड शिल्ड लसीची पहिली मात्रा घेतलेली आहे. त्यांनी कोविड शिल्ड लसीची दुसरी मात्रा घ्यायची आहे.

## अजूनही स्वतःच्या पैशानं लस घेण्यास इच्छुक नाही देशातील जनता, जगात सर्वाधिक दर भारतात

**मुंबई (विशाल कारंडे)-** देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनं अक्षरशः थैमान घातलं आहे. दररोज कोरोना रुग्णसंख्येचा नवीन उच्चांक समोर येत आहे. कोरोनाविरोधात लढा देण्यासाठी लसीकरण हा महत्त्वाचा पर्याय मानला जात आहे. सरकारनंही एक मेपासून १८ वर्षावरील सर्वांना लस घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र, लसीच्या किमतीवरुन अजूनही वाद सुरू आहे. खासगी केंद्रांना २५० रुपयात दिल्या जाणाऱ्या लसीचे दर आता जवळपास सहा पटीनं वाढवले गेले आहेत. सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियानं कोविशील्ड लसीचे दर ७०० ते ९०० रुपये तर भारत बायोटेकनं कोव्हॅक्सिनचे दर १२५० ते १५०० इतके केले आहेत. COWIN वेबसाईटवरुन अशी माहिती मिळते, की आतापर्यंत लसीकरणासाठी खासगी क्षेत्रातील चार कॉर्पोरेट रुग्णालयच समोर आले आहेत. यात अपोलो, मॅक्स, फोर्टिस आणि मणिपाल यांचा समावेश आहे. जगातील बहुतेक देशांमध्ये कोरोना लसीच्या दराबाबत एकरुपता नाही. भारतही




त्यातीलच एक आहे. कोरोनाचा कहर वाढत असतानाही देशातील बहुतेक जनता स्वतःचे पैसे खर्च करुन लस घेण्यासाठी उत्सुक नाही. याच सर्वात महत्त्वाचं कारण आहे, देशात खासगी केंद्रामध्ये वाढलेली लसीची किंमत. भारतात जेव्हा लसीकरणाला सुरुवात झाली होती. तेव्हा केंद्र दोन डोससाठी १५० रुपयांमध्ये लसीचे डोस घेत होतं आणि राज्य सरकार तसंच खासगी रुग्णालयांना याचा पुरवठा करत होतं. इतकंच नाही तर खासगी रुग्णालयांमध्ये प्रति डोस १०० रुपये घेण्याची परवानगी देण्यात आली होती. यावर खासगी रुग्णालयांनी परवानगीही दिली होती. मात्र, अनेक रुग्णालय लसीकरणासाठी २५०-३०० रुपये प्रति डोस आकारत होते. मॅक्स रुग्णालयाच्या एका प्रवक्त्यानं सांगितलं, की आतापर्यंत कोविशिल्डची किंमत ६६०-६७० रुपये होती, यात जीएसटी आणि इतर खर्चही सामील होते. त्यांनी सांगितलं, की जेव्हा लस मागवली जाते, तेव्हा त्यातील पाच ते सहा टक्के लस खराब होते. अशात तिची किंमत ७१० ते ७१५ रुपये होत असते. याशिवाय जे कर्मचारी ही लस देत असतात त्याच्यासाठी पीपीई किट, सॅनिटायझर, बायोमेडिकलची व्यवस्था करावी लागते.

## तिसऱ्या लाटेशी दोन हात करण्यासाठी 1000 फॅमिली डॉक्टरांची टीम तयार करत आहे राज्य सरकार

**मुंबई (विशाल पाटील)- राज्यात गेल्या २४ तासांमध्ये कोरोनाचे ४८,४०१ नवीन रुग्ण सापडेल. तर विशेष म्हणजे, ६०,२२६ रुग्ण बरे होऊन घरी पोहोचले आहेत. याच दरम्यान ५७२ जणांचा कोरोनाने मृत्यू झाला. राज्यात सद्यस्थितीला एकूण ६ लाख १५ हजार ७८३ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. महाराष्ट्रात २.९४ कोटी लोकांची चाचणी झाली.**

त्यापैकी ४४.०७ लाख संक्रमित निघाले. सर्वात महत्वाचे म्हणजे, राज्यात कोरोना संक्रमित झालेल्यांमध्ये बरे होण्याचे प्रमाण आता ८६.४% झाले असून मृतांचा आकडा १.४९% टक्के आहे.केवळ मुंबईत दिवसभरात २३९५ नवे रुग्ण सापडले आहेत. या ठिकाणी १३,८६८ रुग्ण बरे झाले तर ६८ जणांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत आतापर्यंत ६.७६ लाख लोकांना कोरोनाची लागण झाली. तर १३,७८१ जणांनी कोरोनामुळे आपला जीव गमावला. सध्या मुंबईत ५१,१६५ रुग्ण कोरोनावर उपचार घेत आहेत. कोरोना संक्रमणाची दुसरी लाट संपायला आली असून महाराष्ट्र सरकारने तिसऱ्या लाटेशी दोन हात करण्याची तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी एक हजार खासगी फॅमिली डॉक्टरांशी संवाद साधला. व्हिडिओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून त्यांच्याशी चर्चा करण्यात



आली. कोरोनात लोक घाबरून वेळीच रुग्णालयात दाखल होतात. अशात फॅमिली डॉक्टरांचा सल्ला महत्वाचा राहिला आहे. सुरुवातीपासूनच फॅमिली डॉक्टरांच्या सल्ल्याला अन्यसाधारण महत्व आहे. यासोबतच, कोरोना काळ फॅमिली डॉक्टरांसाठी सुद्धा आव्हानाचा काळ आहे. मुख्यमंत्र्यांनी या चर्चेत फॅमिली डॉक्टरांशी चर्चा करून त्यांचे सल्ले ऐकून घेतले. यानंतर त्यांची अंमलबजावणी केली जाणार असे आश्वासनही दिले. मुख्यमंत्र्यांनी अशाच प्रकारे आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक डॉक्टरांशी संवाद साधावा असेही आवाहन यातून करण्यात आले. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत लहान मुलांना सर्वात जास्त धोका आहे. अशात बालरोग तज्ज्ञ आणि फॅमिली डॉक्टरांचे सल्ले घेतले जात आहेत. सरकारने लहान मुलांसाठी वेगळे रुग्णालये, आयसीयू वार्ड आणि व्हेंटिलेटर सुद्धा तयार ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

## मुंबई हादरली, अभिनेत्रीसह बहिणीवर बलात्कार, ५ जणांविरोधात गुन्हा दाखल

**नालासोपारा (गणेश बागडे)-** मुंबईत कोरोनाच्या परिस्थितीमुळे लॉकडाऊन लावण्यात आला आहे. पण, गुन्हेगारीचे सत्र सुरूच आहे. मुंबईजवळील नायगाव परिसरात एका २५ वर्षीय अभिनेत्रीसह तिच्या बहिणीवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित अभिनेत्रीने वालीव पोलीस स्टेशनमध्ये



तक्रार दिली असून ५ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नायगाव परिसरात राहणाऱ्या २५ वर्षीय पीडित अभिनेत्रीला आरोपी महासुबेर परिद याने दारूमधून गुंगीचे औषध दिले होते. त्यानंतर पीडितेसोबत अश्लिल चाळे केले. त्यानंतर या नराधमाने पीडितेच्या बहिणीवर अत्याचार केला. तर महासुबेर परिद याचा मित्र आरोप रमेश याने दोन्ही बहिणीचे हात आणि पाय धरून स्वत: जवळ ओढून अश्लिल चाळे केले. तर यावेळी आरोपी सुधीर चंद्रशेखर, अभिनव विख्यात आणि जगन्नाथ यांनी दोन्ही बहिणींसोबत गैरकृत्य केले. त्यांना कपडे काढून अश्लिल व्हिडीओ रेकॉर्ड केले. या दोन्ही पीडित बहिणींनी याला विरोध केला होता. पण, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली तसंच जीवे मारण्याची धमकी दिली. हा सर्व प्रकार २४ ते २९ एप्रिलच्या दरम्यान कर्नाटकमध्ये घडला आहे. पीडित तरुणी मुंबईत दाखल झाल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली.

## ममता बॅनर्जी यांना पराभूत करणाऱ्या सुवेंदू अधिकारी यांना भाजपकडून विरोधी पक्ष नेते पदाची भेट

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत नंदीग्राम विधानसभा मतदार संघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव करणाऱ्या सुवेंदू अधिकारी यांना भाजपने मोठी जबाबदारी दिली आहे. सुवेंदू यांची राजकीय भूमिका भारतीय जनता पक्षासाठी चांगली ठरली आहे. त्यामुळे भाजपने त्यांना विरोधी पक्ष नेत्याची मोठी जबाबदारी दिली आहे. भारतीय जनता पक्षाने सुवेंदू अधिकारी यांची विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्ती केली आहे. यापूर्वी सुवेंदू अधिकारी यांच्या व्यतिरिक्त बंगाल भाजपचे अध्यक्ष दिलीप घोष आणि मुकुल रॉय यांच्या नावांचीही चर्चा होती. मात्र, सुवेंदू यांना संधी देत पक्षाने मोठी जबाबदारी दिली. सुवेंदू अधिकारी यांनी पश्चिम



बंगालच्या निवडणूक लढाईत तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, सुवेंदूअधिकारी यांनी नंदीग्राम मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांना १९५६ मतांनी पराभूत केले. निवडणुकीत सुवेंदू अधिकारी यांना एकूण १०९६७३ मते मिळाली, तर ममता बॅनर्जी यांना १०७९३७ मते मिळाली. पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या २९४ जागांपैकी २९२ जागांवर ८ टप्प्यात मतदान झाले. २ मे रोजी भारतीय जनता पक्षाने या निवडणुकीत ७७ जागा जिंकल्या, गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी केवळ तीन जागा जिंकल्या. त्याचवेळी तृणमूल कॉंग्रेसने २१३ जागा जिंकल्या आणि बहुमत मिळवले. त्याचवेळी डाव्या आणि इतरांना १-१ जागा मिळाली आहे.

## मराठा आरक्षणाचा प्रश्न गांभीर्याने घेतला नाही, मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा; विनायक मेटेंची मागणी

**सोलापूर (अलीहूसेन शेख)-** मराठा आरक्षण कायदा सुप्रीम कोर्टानं रद्द केल्यानंतर शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे आक्रमक झाले आहेत. मराठा आरक्षणाचा प्रश्न राज्य सरकारनं गांभीर्यानं घेतला नाही. त्यामुळेच सरकारच्या हाती अपयश आलं आहे. याची जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विनायक मेटे यांनी केली आहे. ते नाशिकमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. विनायक मेटे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन महाविकास आघाडी सरकारवर ताशेरे ओढले. मराठा आरक्षणाचा प्रश्न हाताळण्यात अपयश आल्यानं आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी पदाचा राजीनामा द्यावाच, पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही मराठा आरक्षणाचा प्रश्न गांभीर्यानं हाताळलेला नाही. त्यामुळे त्यांनीही राजीनामा देण्याची गरज आहे, असं मत विनायक मेटे यांनी व्यक्त केलं. विनायक मेटे यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांवर उघड रोखठोक हल्लाबोल केला. मुख्यमंत्री म्हणतात आम्ही केंद्राच्या पाया पडतो. पण त्यांनी आरक्षण द्यावं. केंद्राच्या पाया पडण्याऐवजी मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाचा प्रस्ताव तयार करून तो केंद्राला द्यावा आणि पुढची कारवाई करावी, असा टोला मेटे यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला आहे.

## कोरोना उपचाराचे पैसे परत मिळणार, मुंबई हायकोर्टाचे राज्य सरकारला निर्देश

**सोलापूर (जसबीरकौर भामरा)-** मुंबई उच्च न्यायालायाच्या औरंगाबाद खंडपीठानं महात्मा फुले जन आरोग्य योजनेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. नागरिकांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेतील कोरोना उपचाराची बिले परत मिळणार आहेत. कोरोनावरील उपचार घेतलेल्या रुग्णांकडून ज्या खासगी रुग्णालयांनी बिले आकारली ती परत मिळण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश औरंगाबाद खंडपीठानं दिल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनाला महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील रुग्णालयांनी रुग्णांकडून आकारलेली रक्कम परत करण्याविषयी काय कार्यवाही केली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या शिवाय० संबंधित रुग्णालयावर काय कारवाई केली, याचा अहवाल ही न्यायालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट असणाऱ्या काही रुग्णालयांकडून रुग्णांकडून रक्कम घेतली जात असल्याची माहिती समोर आली होती. या प्रकरणी आवाज उठवण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी याचिका दाखल केली होती. ओमप्रकाश शेटे यांच्या याचिकेवर औरंगाबाद खंडपीठानं हा निर्णय दिला. रुग्णांना नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे निर्देश न्यायालयानं दिल्याची माहिती आहे. औरंगाबाद खंडपीठानं महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांना दिलासा देणारा निर्णय



घेतला आहे. रुग्णांनी ज्या खासगी रुग्णालयात उपचार घेतला त्या रुग्णालयाचे बील, मेडिकलच्या पावत्या, रुग्णांचे आधार कार्ड ,रेशन कार्ड, झेरॉक्स प्रत जोडून जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत, असं आवाहन करण्यात आलं आहे. राज्यातील जनतेला गंभीर आजारांवरील उपचारांसाठी पुर्णपणे नि:शुल्क गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधेचा लाभ विशेषज्ञ सेवांतर्गत पॅकेजेससाठी अंगीकृत रुग्णालयांमधून उपलब्ध करून देणे ही आहे. राज्यात सध्या महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह एकत्रितपणे राबवले जाते. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रति कुटुंब प्रति वर्ष १.५० लाख रुपये पर्यंत विमा संरक्षण मिळते. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा २.५० लाख रुपये मर्यादा आहे. या योजने अंतर्गत लाभ घेण्यासाठी पिवळी शिधापत्रिकाधारक ,अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना व केशरी (रु.१ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न) शिधापत्रिका धारक कुटुंबातील नागरिक, औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा या शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका शेतकरी कुटुंबं देखील या योजनेचे लाभार्थी आहेत. शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय अनाथ आश्रमातील मुले,शासकीय वृद्धश्रमातील जेष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांची कुटुंबे तसेच कामगार विभागाने निश्चित केलेले बांधकाम व इतर बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे हे सुद्धा योजनेचे लाभार्थी आहेत.



# खासगी हॉस्पिटल्सच्या महालुटीला आवर घाला!

संपादक:- राकेश शंकर गोरे

राज्यातील कोरोना रुग्णांची असंख्य खासगी हॉस्पिटल्सकडून सध्या प्रचंड लूट सुरू आहे. ही महालूट रोखण्यात महाविकास आघाडी सरकार फेल झाले आहे. बेड मिळत नाही म्हणून वणवण फिरणाऱ्या चिंताक्रांत नातेवाइकांना एखाद्या हॉस्पिटलमध्ये बेड मिळालाच तर आधी (किमान) साडेतीन लाख रुपये भरा, असे दटावले जाते. खासगी हॉस्पिटलमधील बेड, पीपीई किट, सीटी स्कॅन, आरटीपीसीआरचे दर शासनाने ठरवून दिलेले आहेत; पण ते सगळे पार धाब्यावर बसविण्यात आले आहेत. कोरोनाच्या रुग्णावर कोणते उपचार सुरू आहेत, त्याला कोणत्या किमतीची आणि किती औषधे दिली यातील काहीही नातेवाइकाला कळण्याचा मार्ग नाही, कारण रुग्णाला पाहता येत नाही, नातेवाइकांना हॉस्पिटलच्या आवारातही जाता येत नाही. सरकारनं ठरवून दिलेले दर आकारताहेत की नाही हे बघायला सरकार, महापालिकेनं ऑडिटर नेमले; पण धंदेवाईक हॉस्पिटल्स त्यांनाही मॅनेज करतात. काही प्रामाणिक असतीलही, पण वाईटांची आरती कशी करणार? काही हॉस्पिटल्सनी शक्कल शोधून काढली आहे. हल्ली रुग्णांच्या नातेवाइकांकडून म्हणे प्रतिज्ञापत्र लिहून घेतात की, आम्ही हॉस्पिटलनं आकारलेल्या फीबाबत कोणतीही तक्रार करणार नाही! सरकारनं ठरवून दिलेल्या दराचे बिल काढतात आणि इतर बाबींचे बिल न देता कॅश घेतात. हजारो लोकांची आयुष्यभराची बचत या हॉस्पिटलच्या घशात जाते आहे. या लुटीविरुद्ध दाद मागण्याची कोणतीही परिणामकारक पद्धती सरकारनं तयारच केलेली नाही.

रुग्णांना स्पेशल रूम दिली तर सरकारचे दर लागू होत नाहीत, आयसीयू बेडचे दर ठरवून दिलेले नाहीत या फटीचा फायदा घेऊन रुग्णांचा खिसा कापणं सुरू आहे. ज्या गोष्टींचे दर ठरवले त्यात औषधांचा समावेश नाही, किती आणि कोणती औषधं दिली की नाही दिली याची कोणाला कल्पना नाही. त्यामुळे



औषधांचे दर लावताना निव्वळ मनमानी सुरू आहे. कोरोना रुग्णाला किडनी वा इतर आजार असतील तर त्याच्या उपचाराचे दर काय असावेत हे ठरवून दिलेलं नाही. धक्कादायक म्हणजे आरोग्यविमा असलेले रुग्ण स्वीकारणार नाही अशी भूमिका बरीच हॉस्पिटल्स घेत आहेत. त्यांना हा अधिकार कोणी दिला याचा जाब विचारणारी यंत्रणा नाही. दहा दहा लाखांची बिलं काढली जात आहेत. कोरोनाच्या पहिल्या लॉकडाऊनमध्ये अविश्रांत खपणारा बळीराजा सध्या शेतमालाचे भाव पडल्याने हैराण झाला आहे. शेतमजूर, कामगार देशोधडीला लागला आहे. नाडलेल्या सज्जनांकडून नैतिक कारणाशिवाय केलेली अनाठायी वसुली ही खंडणीच असते. सज्जनांचं असं हतबल होणं सुशासनाचं लक्षण नव्हे. पोटासाठी जन्मभर धावणारे गोरगरीब, मध्यमवर्गीयांना फणा वर करता येत नाही, फूत्कार टाकता येत नाही, त्यांना फक्त दंश सहन करावा लागतो. माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध करण्याची ताकद त्याच्यात नसते. हतबल, असहाय्य लोक आप्तेष्टाला वाचवण्यासाठी धडपडताहेत. ऑक्सिजन, व्हेंटिलेटरच्या सुविधा नसलेले हॉस्पिटल कोरोना रुग्णांना भरती करून घेताहेत, चार-पाच दिवस रुग्णाला ठेवायचे, लाख-दीड लाख उकळायचे अन् मग दुसरीकडे रेफर करायचे हाही गोरखधंदा सुरू आहे. नागपूर, नवी मुंबई महापालिकेनं अशा काही हॉस्पिटलना परवा नोटीस दिल्या बाकीच्यांचं काय? रेमडेसिविर अन् लसींची पळवापळवी अजूनही सुरूच आहे. इतर जिल्ह्यात तुटवडा असताना आरोग्य मंत्र्यांच्या जिल्ह्याला कोट्यापेक्षा तिप्पट कोरोना लसी मिळाल्याची बातमी आहे. लॉ-मेकर्स हे लॉ-ब्रेकर्स बनले तर समान न्याय कसा मिळेल?

राष्ट्रवादीच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे बंगाल निवडणूक निकालाच्या दिवशी दुपारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना भेटल्या. निकालाच्या बातम्यांनी माध्यमं व्यापली असताना ही भेट झाल्यानं फारशी चर्चाही झाली नाही. म्हणूनच मुद्दाम भेटीसाठी तो दिवस निवडला असावा. तासभर चर्चा केली. का भेटल्या असतील? पवारसाहेबांच्या तब्येतीची विचारपूस राज्यपालांनी केली होती अन् त्याबाबत अपडेट्स द्यायला सुप्रियाताई भेटल्या म्हणतात; पण तासभर काय चर्चा झाली असेल? दोघेही राजकारणी आहेत तेव्हा राजकारणावर नक्कीच बोलले असतील. बरेचदा आतली माहिती असणारे एक नेते सांगत होते की जरा खोदकाम करा, कॉपी मिळेल! कधीकधी लगेच अशी माहिती मिळत नाही, पण तिला हळूहळू पाय फुटतातच. चंद्रभागेच्या पात्रात देवेंद्र फडणवीसांनी कमळ फुलवलं. त्यामुळे राष्ट्रवादीत अस्वस्थता आहे. अर्थात त्याचा काही संदर्भ या भेटीशी नव्हता म्हणा!

आजकाल विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना वरून फोन येतात की, अमुक माणसाला मदत करा. हा अमुक माणूस कोण आहे माहिती नाही; पण अशा माणसाची 'पुण्य' 'पारख' करणारी व्यक्ती पॉवरफुल्ल असली पाहिजे. 'पुण्य'बाबत निरोप आला की आमचा उपाय नसतो, ते काम करावच लागतं असं एक बडे अधिकारी सांगत होते. 'हाफकिन'मध्ये आदित्य (मंत्री नव्हेत) अन् विनोद हे दोघे 'व्यवहार' बघतात. एका बड्या अधिकाऱ्याच्या भावाबरोबर त्यांची पार्टनरशिप आहे म्हणतात. तिथले व्यवहार एक दिवस चौकशीच्या रडारवर आल्याशिवाय राहणार नाहीत. आदिवासींना अडीचशे कोटींच्या खाद्यवस्तू पुरवण्याचं कंत्राट हायकोर्टात गेलं आहे.

# भविष्यात महाराष्ट्रातील निवडणुकांवर बहिष्कार टाकणार

**ठाणे (सतिश सोनावणे)** - कोरोनामुळे क्लासेस क्षेत्राचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. जवळपास दीड वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही सर्व क्लासेस बंद ठेवावे लागले आहेत. परिणामी संचालक, शिक्षक, कर्मचारी यांना आपला उदरनिर्वाह करणे कठीण जात आहेत.



कोचिंग क्लासेस संचालक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेने स्वतःहून मागील वर्षी मार्च महिन्यात शासनाला सहकार्य म्हणून क्लासेस बंद करण्याचा निर्णय घेतला आणि आतापर्यंत हे सर्व क्लासेस बंदच आहेत. क्लासेस नियोजनबद्ध पद्धतीने सुरू करणे शक्य आहे, तसे निवेदनही संघटनेने शासनाला व सर्व मंत्र्यांना दिलेले आहे. मात्र, आमच्या निवेदनाकडे दुर्लक्ष केले जात असून क्लासेस सुरू करण्यास परवानगी दिली जात नाही, म्हणून महाराष्ट्रातील आगामी निवडणुकांवर आम्ही बहिष्कार टाकणार आहोत, असा इशारा क्लासेस संचालक संघटनेने दिला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव मध्यंतरी कमी झाल्यावर कुठे शाळा सुरू झाल्या होत्या. ऑनलाइन शाळा तर वर्षभर सुरू होत्या. त्यांना त्यांची फी पूर्ण घेण्याचा अधिकार आहे, असेही हायकोर्टाने सांगितले आहे; परंतु क्लासेस बंद आहेत. क्लासेसमध्ये विद्यार्थी संख्येनुसार विद्यार्थ्यांचे नियोजनबद्ध पद्धतीने वर्ग सुरू करता येऊ शकतात, हे आम्ही पटवून सांगितले होते. शासन दरबारी व अन्य मंत्री यांना क्लासेस संचालकांनी निवेदने दिली आहेत. मात्र, क्लासेस सुरू करण्यास अद्यापपर्यंत परवानगी दिलेली नाही. क्लासेस बंद असल्याने क्लासेस संचालकांना शिक्षकांचे पगार, अवाच्या सवा येणारे लाइट बिल, रूम भाडे व घर खर्च हे चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. काही धनदांडग्या श्रीमंत लोकांच्या ऑनलाइन व्यवस्थेला हाताशी धरून सामान्य क्लासेस संचालकांना संपवण्याचे हे षडयंत्र आहे, असा आरोप क्लासेस संचालक संघटना महाराष्ट्र यांनी केला आहे.

# कोरोनाने डहाणूतील फुगे कारखाने बंद, कामगारांची उपासमार

**डहाणू (तृप्ती गोरे):** पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या डहाणूत हजारो भूमिपुत्रांना काम देणारे फुगे कारखाने गेल्या दीड महिन्यापासून बंद असल्याने त्यावर अवलंबून असलेल्या हजारो कुशल, अकुशल कामगारांबरोबरच घरच्या घरी फुगे पॅकिंग, छपाई, प्रिंटिंगचे काम करणाऱ्या महिलांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. तर भर संचारबंदीत बाहेरही कुठे काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाने या दारिद्र्य रेषेखालील गरीब मजुरांची मदत करण्याची मागणी आगवन गावचे उपसरपंच रुपजी कॉल यांनी केली आहे. डहाणू तालुक्यात १९६२ पासून सुमारे दीडशे फुगे कारखाने होते. कच्च्या रबरावर प्रक्रिया करून पारंपरिक पद्धतीने उत्पादित केल्या जाणाऱ्या डहाणूच्या मनमोहक रंगीबेरंगी फुग्याला भारतीय बाजारपेठेत प्रचंड मागणी असते. त्यामुळे रात्रंदिवस सुरू असलेल्या कारखान्यात सुमारे १५ ते



२० हजार कामगारांना रोजगार मिळत होता. परंतु जागतिक बाजारपेठेत दररोज वाढणारे रबराचे दर, त्यातच चायना तसेच श्रीलंका येथील दर्जेदार, टिकावू, फॅन्सी आणि स्वस्त फुग्यांनी भारतीय बाजारपेठ काबीज केल्याने दिवसेंदिवस डहाणूतील फुग्यांची मागणी कमी होत आहे. त्यामुळे असंख्य फुगे कारखाने आर्थिक संकटात सापडून बंद पडू लागले. डहाणूत सध्या ३० ते ३५ फुगे कारखाने आपले अस्तित्व टिकवून आहेत. त्याद्वारे हजारो स्थानिक महिला पुरुषांना रोजीरोटी मिळत आहे. दरम्यान, डहाणूत वडकून, आगवन, सरावली, आशा गड, गंजाड, साव टा. देहणे, रायतली आदी भागात पारंपरिक पद्धतीने उत्पादन घेणारे फुगे कारखाने आहेत. या कारखान्यात काम करणाऱ्या आदिवासींबरोबरच माच्छी समाजातील महिला कामगार मोठ्या प्रमाणात आहेत.

# ग्रामीण परिसरातून होतेय हंडासंस्कृती हद्दपार

**बोर्डी (आकाश कांबळे)**- पालघर जिल्हा हा शहरी, नागरी आणि डोंगराळ भाग असे जिल्ह्याचे स्वरूप आहे. पालघरमधून मुंबई, ठाणे, वसई-विरार, मीरा-भाईंदर या शहरांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र दरवर्षी जिल्ह्याच्या ग्रामीण भागांत पाणीटंचाईची समस्या निर्माण होते. यामुळे धरण उशाला आणि कोरड घशाला, अशी पालघरवासीयांची स्थिती दरवर्षी होत असते.

जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, मोखाडा, वाडा आदी तालुक्यांतील अनेक गावांना सध्या पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जिल्ह्यात असलेल्या धरणांतील पाणी मुंबई, ठाणे, वसई-विरार, मीरा-भाईंदर या शहरांना पुरवले जाते. मात्र धरणांशेजारीच असलेल्या अनेक गावांना मात्र पाणी मिळत नाही, अशी स्थिती आहे. दरम्यान, डहाणू तालुक्यातील घोलवड गावातील मरवाडा या वस्तीतही पाणीटंचाई सुरू आहे. या ठिकाणी नळातील प्रवाहाचा दाब कमी असल्याने नागरिकांना तासनतास रांगेत थांबावे लागते. हंड्याने पाणी भरून घरापर्यंत नेताना, दिवसभरात वीस लिटरही भरले जात नाही. त्यामुळे प्लास्टिक ड्रमच्या वापराने हंडासंस्कृती हद्दपार होत आहे. तालुक्यातील



समुद्रकिनारी भागात जलस्त्रोतांचे पाणी मचूळ असून, उन्हाळ्यात हे प्रमाण वाढते.

घोलवड ग्रामपंचायतीने पाणीपुरवठा योजना राबवली आहे. मात्र ती सुरळीत नसल्याने एप्रिल, मे व जून महिन्यात टंचाई अधिक जाणवते. काही ठिकाणी जलवाहिनीला मोटारपंप जोडून होणाऱ्या पाणीचोरीने, प्रवाहाचा दाब कमी होतो, असे स्थानिक सांगतात. पाणी हंड्यात भरून पुन्हा रांगेत नंबर लावणे अशक्य होते. पुरवठा बंद करण्याच्या अंतिम टप्प्यात प्रवाहाचा दाब वाढल्यावर रांगेत लावलेले ड्रम भरले जातात. त्यानंतर सायकलीला ड्रम लावून वाहतूक केली जाते. पंधरा लिटरचा तेलाचा रिकामा प्लास्टिक ड्रम वापरला जातो.

# नवी मुंबई विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यास स्थानिकांचा विरोध

**पनवेल (आकाश कांबळे):** नवी मुंबई विमानतळाला दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेयांचे नाव देण्याचा प्रस्ताव सिडकोने राज्य सरकारला पाठवला आहे. पण विमानतळ प्रकल्पामुळे बाधित झालेल्या लोकांचा आणि अन्य स्थानिकांचा प्रस्तावित विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यास विरोध आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि दिवंगत माजी खासदार दिनकर बाळू पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याची स्थानिकांची मागणी आहे. शेतकऱ्यांना १२.५ टक्के जागेवर बांधकाम करण्याची परवानगी मिळाली. नवीन मुंबईत विमानतळ बांधण्याचा निर्णय झाला, तेव्हापासून विमानतळाला दिनकर बाळू पाटील याचे नाव देण्याची मागणी होत आहे. डिसेंबर महिन्यात शहर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी, सिडकोला पत्र लिहून विमानतळाला शिवसेनाप्रमुखांचे नाव देण्याचा प्रस्ताव पाठवण्यास सांगितला. संचालक मंडळाच्या बैठकीत सिडकोने हा प्रस्ताव मंजूर केला. या भागातील सर्व पक्षांची बुधवारी बैठक झाली. सर्वपक्षीय समिती स्थापन




मागच्या महिन्यात सिडकोच्या संचालक मंडळाने अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला. शहर बांधणीसाठी शहर विकास महामंडळ जेव्हा जमिनीचे अधिग्रहण करत होते, त्यावेळी दिनकर बाळू पाटील यांनी पनवेल जिल्ह्यात शेतकरी आणि जमीन मालकांसाठी अनेक आंदोलने केली. १९८४ साली आंदोलनाच्यावेळी चार शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर गावठाण योजना आणली. या योजनेतंर्गत सिडकोने अधिग्रहीत केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीपैकी करण्याचा निर्णय झाला. ही समिती सिडकोला त्यांच्या निर्णयाचा फेरविचार करण्यास सांगेल. 'रायगड जिल्ह्यातील जनतेच्या कल्याणासाठी डीबी पाटील यांनी भरीव कार्य केले आहे. पण अजूनपर्यंत एकाही मोठ्या प्रकल्पाला त्यांचे नाव देण्यात आलेले नाही. प्रत्येक प्रकल्पबाधिताची विमानतळाला डीबी पाटील यांचे नाव देण्याची इच्छा आहे' असे प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिले आहे. पनवेलचे भाजपा आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्वपक्षीय समितीचे उपाध्यक्ष बनवण्यात आले आहे.

# कोरोनाचा लहान मुलांना विळखा, पुण्यासह ठाणे, नागपुरात चाईल्ड कोव्हिड सेंटर उभारणार

**ठाणे (गणेश बागडे)**- राज्यासह देशभरात कोरोनाची दुसरी लाट प्रचंड थैमान घालत आहे. पहिल्या लाटेत वयस्कर नागरिकांना कोरोना संसर्गाचा जास्त धोका होता. या दुसऱ्या लाटेसह तिसऱ्या लाटेत लहान मुलं, गर्भवती महिला आणि तरुणांना



कोरोनाचा सर्वाधिक धोका आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात बालरोग तज्ज्ञांची टास्क फोर्स तयार करण्यात येणार आहे. रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविणे, बालकांसाठीचे व्हेंटीलेटर्स, एनआयसीयुमधील बेडस् यांची तयारी करण्यात येत असून या सुविधा वाढविण्यावर भर देण्यात यावा, असेही निर्देश सरकारने दिले आहे. या निर्देशानंतर अनेक ठिकाणी चाईल्ड कोव्हिड सेंटर उभारले जाणार आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेता महापालिका अलर्ट मोडवर आहे. पुण्यात देशातील पहिलं चाईल्ड कोव्हीड केअर हॉस्पिटल उभारलं जाणार आहे. येरवड्यातील राजीव गांधी रुग्णालयात हे चाईल्ड केअर हॉस्पिटल उभारले जाईल. या ठिकाणी २०० ऑक्सिजन बेडची व्यवस्था केली जाणार आहे. या हॉस्पिटलसाठी चार कोटी रुपयांचा खर्च येणार असून येत्या दीड महिन्यात हॉस्पिटलचं काम पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त रूबल अग्रवाल यांनी दिली.



# मेट्रोची चाचणी यशस्वी

**पनवेल (दिगंबर जाधव)- नवी मुंबई मेट्रो मार्गिका १ ची शुक्रवारी दुसरी चाचणी करण्यात आली असून ती यशस्वी झाल्याचा दावा सिडकोने केला आहे. यामुळे स्थानक क्रमांक सात ते अकरा दरम्यानचा प्रवास नवी मुंबईकर या वर्षअखेरीस करू शकतील अशी शक्यताही सिडकोने वर्तवली आहे. यामुळे बेलापूर ते तळोजा मार्गे खारघर या मार्गावरील मेट्रो प्रवासाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.**

यापूर्वी २१ महिन्यांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पहिली चाचणी करण्यात आली होती. अनेक वर्षांपासून नवी मुंबईकर मेट्रो प्रवासाच्या प्रतीक्षेत आहेत. शुक्रवारी करोनाकाळात संपूर्ण यंत्रणा गुंतलेली असताना सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीमध्ये मेट्रोची दुसरी चाचणी घेण्यात आली. आगार प्रवेश छन्नमार्गावर आणि तळोजा आगारातील चाचणी मार्गावर मेट्रोची चाचणी घेण्यात आली. एकूण ८५० मीटर लांबीच्या मार्गावर मेट्रो शुक्रवारी धावली. सुरक्षिततेच्या कारणास्तव ताशी ६५ किलोमीटरचा वेग यावेळी राखण्यात आला. नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग (एलिव्हेटेड कॉरिडॉर) विकसित करण्यात येत आहेत. तळोजा आगार येथील आगार प्रवेश छन्नमार्गावर (अॅप्रोच व्हायडक्ट) मेट्रोची यशस्वी चाचणी करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार ही चाचणी घेण्यात आली. मेट्रो प्रकल्पाच्या बेलापूर ते पेंधर या मार्ग क्रमांक १ च्या जलद अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनची (महा मेट्रो) नियुक्ती करण्यात आली असून महा मेट्रोकडून २३ फेब्रुवारीला प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता २० तज्ज्ञ अभियंत्यांच्या गटाची स्थापना करण्यात आल्याचे सिडकोने सांगितले आहे.



**रत्नागिरी पोलीस ठाणे हद्दित SDPO श्री. वाघमारे व पोलीस निरीक्षक लाड यांनी अवैध गावठीदारु हातभट्टींवर कारवाईची संयुक्तरित्या मोहीम राबवत प्रोव्हि. रेड केली व रु. १,४०,९०० किंमतीचा माल जप्त केला.**

# पनवेलमधील सदनिका, दुकानांचे भाडे महागणार?

**पनवेल (प्रतिनिधी)** - पनवेल महापालिकेने जाहीर केलेल्या मालमत्ता कराच्या सुधारित आदेशामध्ये भाडेतत्त्वावर दिलेल्या मालमत्तांसाठी दुप्पट मालमत्ता कर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा अतिरिक्त कर दुकान वा सदनिका मालक भाडेकरूच्या माथी मारण्याची शक्यता असून त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील दुकाने व घरे यांचे भाडे वाढण्याची शक्यता आहे. पालिकेने यापूर्वी भाड्याने दिलेल्या मालमत्तेच्या एकूण वार्षिक दुप्पट कर भाड्याने दिलेल्या मालमत्ताधारकाने पालिकेकडे भरावा अशी नवी तरतूद यात करण्यात आली आहे.

पनवेल पालिका क्षेत्रात एकूण तीन लाख २० हजार मालमत्ता असल्याची पालिकेची नोंद आहे. यापैकी ४० हजार दुकाने व सदनिकांच्या मालमत्ताधारकांना दुप्पट मालमत्ता कर मोजावा लागणार आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फटका पालिका हद्दीत असलेल्या २९ गावांमधील व्यवहारांनाही बसणार आहे. तळोजा



उत्पन्नाच्या ६२ टक्के दराने वार्षिक भाडेमूल्य दर आकारणी करण्याचे धोरण पालिकेने आखले होते. मात्र सत्ताधारी भाजपने विरोध करत हे धोरण बदलण्यास प्रशासनाला भाग पाडले. त्यानंतर पालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी भाडेतत्त्वांवर दिल्या जाणाऱ्या मालमत्तांच्या वार्षिक भाडेमूल्य दराच्या मालमत्ताकर आकारणीच्या पद्धतीमध्ये बदल केला. मालमत्ताधारक वापर करत असलेल्या मूळ मालकाला जेवढा कर आला आहे त्याच्या औद्योगिक वसाहतीमधील नावडे, पेणधर, तोंडरे, वलप, पडघा, ढोंगऱ्याचा पाडा, देवीचा पाडा, नागझरी, घोट, कोयनावेळे, तळोजा या गावांमध्ये आजही मोठ्या प्रमाणात चाळी बांधून त्यामध्ये भाड्याने कंत्राटी कामगारांना घरे देण्यातूनच स्थानिक ग्रामस्थांचे अर्थकारण सुरू असते. वाढीव मालमत्ता कराचा बोझा अर्थात भाडेकरूच्या खांद्यावर पडणार असल्याने पनवेलमधील भाड्याने दिल्या जाणाऱ्या मालमत्तांचे भाडेशुल्क वाढणार आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# कडक निर्बंधाच्या घोषणेनंतर उसळली गर्दी

**मुंबई (राकेश गायकवाड):** कोरोनाचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी राज्यात निर्बंध लागू असले तरी रुग्णांची संख्या वाढतेच आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईसह सोलापूर, लातूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांत निर्बंध आणखी कडक करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. तर सातारा आणि सांगली जिल्ह्यांत कडक निर्बंध आधीच लावण्यात आले आहेत. या काळात वैद्यकीय सेवा वगळता इतर सर्व व्यवहार बंद राहणार असल्याने खरेदीसाठी येथे नागरिकांची एकच गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. सोलापुरात ८ मेच्या रात्री ८ वाजल्यापासून १५ मे रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत कडक संचारबंदी राहणार आहे. या दरम्यान वर्तमानपत्रे, बँका तसेच मेडिकल या अत्यावश्यक सेवा वगळता किराणा, भाजीपाला, दूध डेअरी या सेवा बंद राहतील. मार्केट यार्डही बंद राहील. पासधारक दूध विक्रेत्यांना घरपोच दूध विक्री करता येईल. त्यामुळे बाजारपेठेत खरेदीसाठी सोलापूरकरांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, या आठवड्यात रमजान ईद असल्याने ईद काळात संचारबंदी शिथील करा, अशी मागणी शहरातील विविध मान्यवरांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे.



लातूर जिल्ह्यात ८ ते १३ मे या कालावधीत निर्बंध आणखी कडक करण्याची घोषणा करण्यात आली. त्यानंतर सकाळी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती. गंजगोलाई, आडत बाजार, भुसार लाइन, किराणा दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी होती. सहा दिवसांच्या काळात केवळ वैद्यकीय सेवा चालू राहील. अन्य आस्थापने, किराणा, भाजीपाला दुकानेही बंद राहतील. खरेदीसाठी गर्दी झाल्याने फिजिकल डिस्टन्सिंगचा फज्जा उडाला. गर्दी एवढी वाढली की, शहरातील अनेक रस्ते जाम झाले होते. बऱ्याच दिवसांनंतर शहरातील रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी झालेली पाहायला मिळाली. वर्धा जिल्हा प्रशासनाने ८ ते १३ मे या कालावधीत कडक निर्बंध लागू केले आहेत. फक्त रुग्णालये व औषधांचीच दुकाने सुरू राहणार आहेत. बाकी संपूर्ण व्यवहार बंद राहणार असून पार्सल सुविधा देण्याची मुभा देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या सर्वच बाजारपेठांमध्ये सकाळी ८ ते ११ या कालावधीत तोबा गर्दी झाली होती.

## एसटीच्या कर्मचाऱ्यांना प्राधान्याने लस उपलब्ध करून द्यावी

**मुंबई (योगेश होळंब)-** टाळेबंदीच्या काळात राज्यभरातील अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांची वाहतूक करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांनादेखील कोविड योद्धे समजून लसीकरणात प्राधान्य द्यावे, अशी विनंती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष अॅड. अनिल परब यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. परब म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विविध कामामध्ये एसटी कर्मचारी आत्तापर्यंत अग्रेसर राहिले आहेत. एसटी कर्मचाऱ्यांना अनेकदा आपल्या कुटुंबापासून लांब जावे लागते, राहावे लागते. प्रवासादरम्यान अनेक प्रवाशांशी त्यांचा संपर्क येतो. तसेच शासनाच्या निर्देशानुसार सार्वजनिक वाहतूक सेवेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोरोनाची चाचणी करणे आवश्यक केले आहे. या सगळ्याचा विचार करता, संबंधित एसटी कर्मचाऱ्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊन त्यांचे लसीकरण प्राधान्याने करण्यात यावे, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना केली आहे. एसटी महामंडळात सध्या सुमारे ९८ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये पोलीस कर्मचारी, डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी, बँक कर्मचारी अशा अनेक अत्यावश्यक सेवेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित प्रवासी सेवा देण्याचे काम एसटीचे कर्मचारी अव्याहतपणे करीत आहे. याबरोबरच गेली दीड वर्ष शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार लाखो परप्रांतीयांना राज्याच्या



सीमेपर्यंत सुरक्षित नेऊन सोडणे, हजारो विद्यार्थ्यांना परराज्यांतून महाराष्ट्रात त्यांच्या घरी सुखरूप आणून सोडणे, हजारो ऊसतोडणी कामगारांना कारखान्यापासून त्यांच्या घरी पोहोचवणे, तसेच अत्यावश्यक सेवेतील अन्नधान्य, शेतीमाल व इतर मालवाहतुकीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणे, वैद्यकीय ऑक्सिजन टँकरसाठी, तसेच शासकीय रुग्णवाहिकेसाठी चालक पुरवणे असे कामे एसटी कर्मचाऱ्यांनी केली आहेत.

## दुसऱ्या लाटेसाठी उभारणार १ लाख कोटींचा निधी

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** कोविड-१९ साथीच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर १ लाख कोटी रुपयांचा साथ संचित निधी (पँडेमिक पूल) उभारण्याचा विचार केंद्र सरकारने चालविला आहे. कोविड अथवा भविष्यात येऊ शकणाऱ्या अशा संभाव्य साथीचा फटका बसलेल्या विमा संरक्षणरहित नागरिकांना यातून मदत केली जाऊ शकेल, असे सूत्रांनी सांगितले. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, विमा नसलेल्या ज्या लोकांनी आपली नोकरी गमावली आहे; अथवा उत्पन्नाची साधने गमावली आहेत, त्यांना आर्थिक साहय करण्यासाठी, तसेच वैद्यकीय सेवा देण्यासाठी हा संचित निधी उभारण्यात येत आहे.



## राज्य सरकार तिसऱ्या लाटेसाठीही सज्ज, केंद्रानं ऑक्सिजनची गरज भागवावी; राजेश टोपेंची मागणी

**मुंबई (विशाल पाटील)-** राज्य सरकार कोरोना विरुद्धच्या लढ्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असून ऑक्सिजन निर्मितीसाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राज्यात सध्या ३८ ऑक्सिजन प्लांटमधून ५३ मेट्रीक टन ऑक्सिनजची निर्मिती होत आहे. पण सध्या इतका ऑक्सिजन राज्याला पुरत नाहीय. राज्याची १७०० मेट्रीक टन ऑक्सिजनची गरज केंद्र सरकारनं भागवली पाहिजे, अशी मागणी राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे



यांनी केली आहे. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

राजेश टोपे यांनी यावेळी कोरोना विरुद्धच्या उपाययोजना आणि राज्य सरकार करत असलेल्या कामांची सविस्तर माहिती दिली. राज्यात आतापर्यंत २८ लाख लोकांना कोरोना विरोधी लसीचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत आणि येत्या काळात जास्तीत जास्त वेगानं लीसकरण मोहीम राबविण्यासाठी राज्य सरकार संपूर्णपणे प्रयत्न करत आहे, अशी माहिती टोपे यांनी यावेळी दिली. कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सीन या दोनच लसी सध्या नागरिकांना उपलब्ध होत असल्या तरी यात कोव्हॅक्सीनचा राज्यात तुटवडा निर्माण होत आहे. त्यामुळे कोव्हॅक्सीनच्या पुरवठ्याबाबतही केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

## मुंबई विमानतळावर उतरणाऱ्या देशांतर्गत प्रवाशांसाठी नवी नियमावली

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** देशभरातील वाढत्या कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई विमानतळ प्रशासन सतर्क झाले आहे. बाहेरील राज्यांतून मुंबईत



दाखल होणाऱ्या प्रवाशांसाठी गुरुवारपासून नवी नियमावली लागू करण्यात आली आहे. देशांतर्गत प्रवाशांसाठी लागू केलेल्या नव्या नियमावलीनुसार दिल्ली, राजस्थान, गोवा, केरळ, गुजरात, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांतून मुंबई विमानतळावर दाखल होणाऱ्या प्रवाशांना कोरोना चाचणीचा निगेटिव्ह अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. हा आरटी-पीसीआर अहवाल ७२ तासांसाठी वैध मानला जाईल. उपरोल्लेखीत राज्यांमधून आलेल्या प्रवाशांकडे तसा अहवाल नसल्यास मुंबई विमानतळावर त्यांची चाचणी केली जाईल. त्याचा सर्व खर्च प्रवाशांकडून वसूल केला जाईल, असे विमानतळ प्रशासनाने स्पष्ट केले. सध्या मुंबई विमानतळावर आरटी-पीसीआर चाचणीसाठी ६०० रुपये आकारले जातात. त्याचा अहवाल ८ ते २२ तासांपर्यंत देण्यात येतो. जलद अहवाल हवा असल्यास ४ हजार ५०० रुपये मोजावे लागतात. हा अहवाल १३ मिनिटांत दिला जातो.

## रूळ ओलांडताना होणाऱ्या अपघातांत घट

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** रूळ ओलांडणे धोकादायक असून अनेक जण हा धोका पत्करतात व त्यात अनेकांचा मृत्यू होतो. पश्चिम रेल्वेने केलेल्या उपाययोजनांमुळे उपनगरीय मार्गावर रूळ ओलांडताना होणाऱ्या अपघातांत घट झाली आहे. २०१९-२० मध्ये रेल्वे रूळ ओलांडण्याच्या ५२८ घटना घडल्या होत्या. त्यांची संख्या कमी होऊन २०२०-२१ मध्ये २२२ झाली आहे.



रेल्वे रूळ ओलांडणे जिवावर बेतू शकते, त्यामुळे रूळ ओलांडू नका, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून वारंवार केले जाते. त्यासाठी जनजागृती मोहीमही हाती घेतल्या जातात. तर रूळ ओलांडणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उचलला जातो. तरीही अनेक जण याकडे दुर्लक्षच करतात. त्यामुळे मुंबई उपनगरीय मार्गावर दर दिवशी १० पेक्षा जास्त प्रवाशांना मृत्यूला सामोरे जावे लागते. शॉर्टकटचा मार्ग म्हणून रुळांजवळील झोपडपट्टीवासीय संरक्षक भिंतीला भगदाड पाडतात, तर काही जण लोकल पकडण्याच्या नादात एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जातात. संरक्षक भिंत किंवा जाळी नवीन बांधणे, पादचारी पुलाची व्यवस्था करणे इत्यादी उपाययोजना रेल्वेकडून केल्या जातात. या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी पश्चिम रेल्वेनेही उपनगरीय रेल्वे मार्गावर १०७ किलोमीटरची संरक्षक भिंत बांधली आहे. तसेच ३३ ठिकाणी खासगी सुरक्षा व्यवस्था पुरविली आहे. वर्ष २०२०-२१ मध्ये ६४, तर चालू आर्थिक वर्षात सात ठिकाणी भिंतींना पाडलेले भगदाड बुजविण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. याशिवाय मार्च २०२१ पर्यंत उपनगरीय रेल्वे मार्गावरील २७६ अतिक्रमणेही हटवण्यात आली आहेत. रूळ ओलांडणाऱ्यांविरोधात रेल्वे सुरक्षा दलाकडून गुन्हाही दाखल केला जातो. पश्चिम रेल्वेने २०२० मध्ये १० हजार ६०० आणि २०२१ मध्ये ३,४०० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

# कठोर निर्बंधांमुळे मत्स्यउद्योग अडचणीत

**मुंबई (विशाल कारंडे): कठोर निर्बंध लागू झाल्यापासून मुंबईतील मासळीबाजार ओस पडले असून राज्यांतर्गत मागणी प्रचंड घट झाल्यामुळे मुंबईतील मत्स्यउद्योग अडचणीत आला आहे. समुद्र किनारा न लाभलेल्या राज्यातील बहुतांशी जिल्ह्यात मुंबईतून मासे पुरवले जातात. करोना संसर्गामुळे विविध जिल्ह्यांतून माशांची मागणी खूप कमी झाली आहे. तसेच माशांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्यामुळे गेल्या वर्षभरात मस्यप्रेमींचा कल कोंबडी आणि मटणाकडे वाढू लागला आहे.**

मुंबईतील बंदरावर मासे खरेदीसाठी ठाणे, कल्याण, डोंबिवली, पालघर, पनवेल आदी जिल्हा आणि तालुक्यांमधून मत्स्यविक्रेते येतात. कठोर निर्बंधांमुळे हा व्यवसाय ठप्प झाल्याचे मच्छिमार कृती समितीचे प्रफुल्ल भोईर यांनी सांगितले. 'पहाटे



बंदरावर आलेल्या विक्रेत्यांना मासे खरेदीकरून गाड्या भरून निघेपर्यंत सकाळचे ८ वाजतात. तिथून पुढे ठाणे, कल्याण, पनवेल, पालघर आदी ठिकाणी पोहोचायला त्यांना किमान दोन ते तीन तास लागतात. तोवर ११ वाजलेले असतात. सकाळी ११ नंतर बाजारपेठ सक्तीने बंद केली जाते. त्यामुळे त्यांना व्यवसाय करता येत नाही. आजचे मासे उद्या विकले तर लोक खरेदी करत नाही. त्यामुळे तेथील विक्रेत्यांनी मुंबईकडे पाठ फिरवली आहे. किंबहुना तेथील एकूणच विक्रीवर मोठा परिणाम झाला आहे,' असे भोईर म्हणाले. 'मुंबईतील बंदरावर गेल्या काही महिन्यात माशांची उपलब्धता कमी झाली आहे.

त्यामुळे माशांच्या किमतीवर परिणाम झाला आहे. सध्या नागरिकांची क्रयशक्ती कमी झाल्यामुळे बाजारात कुणी फिरकत नाही. माशांचे अव्वाच्या सव्वा भाव लोकांना परवडणारे नाहीत. किरकोळ विक्रेते आमच्याकडून १०० किलो मासे नेत होते. ते आता केवळ २० किलोच मासे घेतात. त्यामुळे मुंबईहून आम्ही मासे आणणे बंद केले आहे,' असे पुण्यातील मत्स्य व्यापारी महेश परदेशी यांनी सांगितले.

अशीच अवस्था इतर जिल्ह्यांची आहे. माशांचे भाव, प्रवास भाडे यावर होणाऱ्या खर्चातून नफा मिळविणे अवघड होते. वेळप्रसंगी भाव पाडून मासे विकावे लागतात. दिवसेंदिवस करोनाचे प्रमाण वाढत असल्याने ग्राहकही बाजारात फिरकत नाही. मग मासे मागणीअभावी फेकून द्यावे लागतात, असे सातारा, कोल्हापूर, रत्नागिरीतील व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यात ग्रामीण भागातील ढाबे, उपहारगृहांचा व्यवसाय मंदावल्याने माशांच्या विक्रीवर परिणाम झाला आहे.

## नव्या शैक्षणिक वर्षांतही शुल्ककपातीचा आग्रह

**मुंबई (विशाल कारंडे):** करोनाच्या सावटाखाली गेले अख्खे शैक्षणिक वर्ष प्रत्यक्ष शाळेविना गेल्यानंतर आता नवीन शैक्षणिक वर्षांत तरी शाळा खुल्या होतील का, याबाबत साशंकता आहे. अशातच पालकांनी यंदाच्या वर्षीही शुल्ककपातीसाठी शाळा व्यवस्थापनांकडे तगादा लावला आहे. मात्र, त्याला शाळांचा विरोध आहे. परिणामी आता पालक संघटना ऑनलाइन याचिका, स्वाक्षरी मोहिमांच्या माध्यमातून शुल्ककपातीसाठी व्यापक मोहीम राबवत आहेत.

करोनाचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदी यामुळे गेले संपूर्ण शैक्षणिक वर्ष शहरी भागांत शाळा सुरूच होऊ शकल्या नाहीत. ग्रामीण भागातही सुरू झालेल्या शाळा फेब्रुवारीअखेरपासून दुसरी लाट येऊ लागल्याने बंद कराव्या लागल्या. परिणामी विद्यार्थ्यांचे एक शैक्षणिक वर्ष शाळेविना ऑनलाइन शिक्षणात गेले आहे.

गेले वर्षभर शाळा बंद असल्यामुळे खर्च कमी झाला




असल्याने तसेच करोनाकाळात पालकवर्गही आर्थिक संकटात सापडल्याने शुल्ककपात करण्यावरून पालक आणि शाळा व्यवस्थापनांत वाद होत होते. अनेक शाळांची न्यायालयीन प्रकरणेही झाली. अद्यापही पालक आणि शाळा व्यवस्थापनातील वाद सुरूच आहे. गेल्या वर्षी अनेक पालकांनी शाळांना संपूर्ण शुल्क दिलेले नाही. आता पुढील वर्षांचे शुल्कही कमी व्हावे यासाठी पालकांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचवेळी शाळांनीही शुल्कासाठी तगादा लावला आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षांचे सर्व शुल्क एकरकमी भरण्याची सूचना शाळा देत आहेत. मात्र, याला पालकवर्गाचा विरोध आहे. शाळांनी गेली अनेक वर्षे नफा मिळवला आहे. गेल्यावर्षीपासून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींना तोंड देत आहेत.

## लशींची उपलब्धता पाहूनच घराबाहेर पडावे

**मुंबई (सम्यक कासारे)-** महापालिकेच्या लसीकरण केंद्रांवर लशींची उपलब्धता पाहूनच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी केले. महापालिकेच्या ट्विटरवर याबाबत माहिती दिली जाते, ती पाहावी असे ते म्हणाले.



शिवसेना नगरसेविका सान्वी तांडेल यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या चुनाभट्टीतील माँसाहेब मीनाताई ठाकरे प्रसूतिगृहातील लसीकरण केंद्राचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महापौर किशोरी पेडणेकर, आ. संजय पोतनीस, मंगेश कुडाळकर, एल विभागाचे साहाय्यक आयुक्त मनीष वाळुंज उपस्थित होते. त्याचबरोबर लोअर परळच्या सेनापती बापट मार्गावरील द वर्ल्ड टॉवरमधील पालिकेच्या वाहनतळाच्या जागेत १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांसाठी, तर ४५ वर्षांपुढील नागरिकांसाठी ड्राइव्ह इन लसीकरण केंद, पवई उद्यान शाळेतील लसीकरण केंद्राचेही किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते लोकार्पण झाले.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**मध्य मुंबई (सा. बां) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८**

Email : centralmumbai.ee@mahapwd.com **दूरध्वनी क्रमांक ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स- २४९३१९०२**

**जा क्र. का. अ/ममुंवि/निविदा/ २७०१ दिनांक: ०६/०५/२०२१**

**ई-निविदा सूचना क्रमांक १ सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, वरळी, मुंबई (दूरध्वनी:४९३६४०४/२४९३१९०२) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील मजूर सहकारी संस्था मर्यादित यांच्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | नागपाडा पोलीस रुग्णालय मुख्य इमारतीच्या मेंगलोरी छत, दरवाजे, खिडक्या व फरशीची विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत दुरुस्ती | २४.३३ |
| २ | भायखळा पोलीस इमारतीच्या मेंगलोरी छत, दरवाजे, खिडक्या व फरशीची विविक्षीत दुरस्ती अंतर्गत दुरुस्ती | २०.७२ |
| ३ | भायखळा कारागृह मुख्य प्रशासकीय इमारतीच्या परिसरातील इमारतीच्या मेंगलोरी छत, दरवाजे, खिडक्या व फरशीची दुरुस्ती करणे | २५.११ |
| ४ | भायखळा कारागृह बॅरेक क्र. १ व २च्या दरवाजे, खिडक्या व फरशीची दुरुस्ती करणे | २६.५८ |
| ५ | भायखला कारागृहाच्या प्रशासकीय इमारतीमधील आय.जी.च्या कॅबीनची दुरुस्ती करणे व किरकोळ दुरुस्ती अंतर्गत वर्कशॉप व सा. बां. शाखा भांडार, मोटार वाहनतळ व लॉरी शेडए | १५.१९ |
| ६ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ताडदेव मुंबई येथील पेतीत मिल आवारातील पोलीस वसाहत इमारत क्र.२,३,४,४अ,५,६,७,८ व ९ येथील इमारतीच्या किरकोळ दुरुस्ती व पावसाळी पूर्व | ८.९३ |
| ७ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत आर्थररोड मध्यवर्ती कारागृह मुख्य इमारत परिसरातील बॅरक क्र. २,३,४,५,६,७,,८,९,१०,११ केंद्रीय पोलीस राखीव दल, अतिसुरक्षा जेल, न्यायालयीन | ८.८६ |
| ८ | शिवडी मुंबई पोलीस वसाहत इमारत क्र. बी व सी येथील पावसाळी पूर्व कामे करणे. | १०.०० |
| ९ | बाडीबंदर मुंबई पोलीस वसाहत इमारत क्र. अ व ब येथील पावसाळी पूर्व कामे करणे | ९.९८ |
| १० | माझगांव मुंबई येथील न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या वसाहतीत पाररिजात इमारती येथील पावसाळी पूर्व कामे करणे. | ७.६६ |
| ११ | हाफकिन्स संस्था परेल मुंबई येथील कर्मचारी वसाहत इमारत क्र. अ व ब व मोतदार वसाहत इमारत क्र. १ व २ येथील किरकोळ दुरुस्ती व पावसाळी पूर्व कामे करणे. | ९.९८ |
| १२ | किरकोळ दुरुस्तीतंर्गत वरळी, मुंबई येथील कामगार रुग्णालय आवारातील वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३, वर्ग-४आणि हाउस मॅन क्टाटर्स इमारतीमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | ४.२० |
| १३ | किरकोळ दुरुस्तीतंर्गत वरळी, मुंबई येथील कामगार रुग्णालय मुख्य इमारतीमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | ८.५१ |
| १४ | किरकोळ दुरुस्तीतंर्गत वरळी, मुंबई येथील पोद्दार रुग्णालय व आवारातील विद्यार्थ्यांनी वसतीगृह, नवीन रसायन शाळा, बाह्य रुग्ण विभाग इमारतीमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | २२.६५ |
| १५ | किरकोळ दुरुस्तीतंर्गत वरळी मुंबई येथील प्रवासी, स्नेहा अ/ब या शासकीय इमारतीमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | १०.५५ |
| १६ | किरकोळ दुरुस्तीतंर्गत पोलीस कॅम्प, मुंबई येथील शासकीय परिवहन सेवा वाहतुक मुख्यालय व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयांमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | १८.७४ |
| १७ | किरकोळ दुरुस्तीतंतर्गत वरळी कॅम्प, मुंबई येथील इमारत क्र. १ ते २६ व सशस्त्र पोलीस मुख्यालय ल विभाग-३, के-१, के-३ आणि आरमरी बॅरेकमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | १७.६६ |
| १८ | किरकोळ दुरुस्तीतंतर्गत वरळी पोलीस कॅम्प, मुंबई येथील इमारत क्र. ३७ ते ५४मध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना, पाणीपुरवठा पाईपलाईनची दुरुस्ती तसेच घनकचरा उचलणे. | १४.७२ |
| १९ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. १ ते २० येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २९.३९ |
| २० | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ११ ते ४० येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २८.२९ |
| २१ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ४१ ते ४९, ५१ व ५३ते ६२ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २८.८६ |
| २२ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र.६३ते८२ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २९.२१ |
| २३ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ८३ ते १०२ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २६.८४ |
| २४ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. १०३ ते १२१ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २५.२४ |
| २५ | ना. म. जोशी मार्ग येथील बी.डी.डी चाळ क्र. १ ते ३० व ३२ येथे पावसाळ्यापूर्वी कामे सन. २०२१-२२ करणे | १९.१४ |
| २६ | शिवडी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ५ ते १६ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २३.७७ |
| २७ | नायगांव येथील बी.डी.डी. चाळ क्र. १ ते अ-१९ व ब-१ ते ब-२ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २८.७० |
| २८ | नायगांव येथील बी.डी.डी. चाळ क्र. बी-३ ते बी-२३ येथे पावसाळ्यापूर्वी कामे व गच्चीवर डांबरीकरण करणे. सन. २०२१-२२करणे | २९.८५ |
| २९ | किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत ना. म. जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळ क्र. १ ते २२ येथील गच्चीवर डांबरीकरण करणे. | १८.२५ |
| ३० | दादर येथील उत्तर बा. बा. उपविभाग दादर बाभा इमारती एसीबी कार्यालय, माटुंगा पोलीस स्टेशन, सियावाडी ट्यूब सेंटर, दादर या इमारतीतील पावसाळा दरम्यान होणारी गळती प्रतिबंधकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. | ७.०८ |
| ३१ | माहीम येथील माहीम पोलिस वसाहत इमारत क्र. ९बी १३ ते १५ बी पंप रूप इमारतीमधील पावसाळा दरम्यान होणारी गळती प्रतिबंधकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. | ११.९५ |
| ३२ | विशेष दुरुस्ती अंतर्गत माहिम, मुंबई येथील नवीन पोलिस वसाहत इमारत क्र. १४ येथे बाह्य गिलाव व रंगकाम करणे. | १९.१९ |
| ३३ | माहिम येथील माहिम पोलीस वसाहत इमारत क्र. १५ इमारतीमधील प्रसाधनगृह शौचालय दुरुस्ती व दरवाजे नुतनीकरण, किचन ओटा, गळतीप्रतिबंधक प्रक्रिया व लादींची दुरुस्ती करणे. | २८.११ |
| ३४ | माहिम येथील माहिम पोलीस वसाहत इमारत क्र. १९ इमारतीमधील प्रसाधनगृह शौचालय दुरुस्ती व दरवाजे नुतनीकरण, किचन ओटा, गळतीप्रतिबंधक प्रक्रिया व लादींची दुरुस्ती करणे. | २८.११ |
| ३५ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत माटुंगा पोलीस ठाणे, माटुंगा, मुंबई दरवाजे व खिडक्या व नळ कामांची गळती थांबविणे व पॉलीमर गिलावा करणे | २८.३१ |
| ३६ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. १ ते १३, ५५ ते ६८, ८३ ते ९५, नायगाव येथील बीडीडी चाळ क्र. अ-१५ ते अ-१९, बी ३ ते बी ९ ब व जीटी येथील बीडीडी चाल क्र. १६ ते ३० व ३२ येथील कॉम्प्रेट पाईपलाईन, ड्रेनेज लाईन इन्स्पेक्शन चेंबर्सची दुरुस्ती करणे | १६.३० |
| ३७ | विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय इमारत भायखळा मध्यवर्ती कारागृहाच्या दरवाजे, खिडक्या व फरशीची दुरुस्ती व गिलावा करणे. | २५.११ |
| ३८ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था आग्रीपाडा येथे कार्यशाळा इमारत क्र. ए पहिल्या मजल्यावरील वर्ग, तळ मजल्यावरील टर्नर सेक्शन विशेष दुरुस्ती इ. कामे करणे. | २१.४५ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. १२/०५/२०२१ सकाळी १५.०० पासुन ते १९.०५.२०२१ रोजी १५.००पर्यंत ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दि. २०/०५/२०२१ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा. बां.) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी मुंबई- ४०० ०१८)**

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) http://mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग वरळी मुंबई कार्यालयातील सूचना फलक

*कार्यकारी अभियंता,*
*मध्य मुंबई (सा. बां.) विभाग*
*वरळी, मुंबई*

**डीजीआयपीआर/ २०२१-२०२२/ ३९८**

# ‘माझा डॉक्टर्स’ बनून मैदानात उतरा - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आवाहनाला डॉक्टरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई (दिपेश गोरिवले)- मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील एका वैशिष्ट्यपूर्ण व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे राज्य टास्क फोर्समधील तज्ज्ञ डॉक्टर्सनी मुंबईतील सुमारे ७०० खासगी डॉक्टर्सना कोरोनाबाबतीत वैद्यकीय उपचारांबाबत निश्चित काय पद्धती अवलंबवावी याविषयी एकाचवेळी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या अनेक शंकांचे निरसन केले. विशेष म्हणजे तीन चार दिवसांपूर्वी अशाच पद्धतीने मुंबईतील सुमारे ३०० डॉक्टर्सशी संवाद साधण्यात आला होता.**

दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित या दोन्ही सभांमध्ये मिळून मुंबईतील सुमारे एक हजार डॉक्टर्सनी सहभाग घेतला. केवळ काही डॉक्टर्सशी न बोलता तंत्रज्ञानाचा सुयोग्य उपयोग करून अगदी थेट तळागाळात काम करणाऱ्या शेवटच्या डॉक्टरशी बोलण्याचा आणि त्यांच्याही सूचना ऐकून घेण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या उपक्रमाचे वैद्यकीय क्षेत्रात स्वागत होत आहे. अशाच रितीने राज्यातील इतर विभागातील डॉक्टर्सशी देखील संवाद साधण्यात येणार आहे.

या सभेच्या प्रारंभी बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना प्रतिबंधात वैद्यकीय क्षेत्र करीत असलेल्या लढाईसाठी त्यांची प्रशंसा केली तसेच येणाऱ्या तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्यास सांगितले. मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, कोरोना काळात फॅमिली डॉक्टर्सची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे कारण कोणत्याही लहान मोठ्या आजारात रुग्ण पहिल्यांदा आपल्या जवळच्या, परिवाराच्या डॉक्टरशी संपर्क साधतो. त्यामुळे त्यांची जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. सर्वसामान्यांना आपण ‘माझा डॉक्टर’ बनून त्यांना मार्गदर्शन केल्यास रोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच तो रोखण्यात मोठी मदत होणार आहे असे ते म्हणाले.



लक्षणे नसलेले रुग्ण रुग्णालयात जातात आणि आवश्यक नसतानाही त्यांना बेड्स उपलब्ध करून दिले जातात यामुळे खऱ्या गरजू रुग्णांना सुविधा मिळत नाहीत. त्याचप्रमाणे कोविड रुग्ण उशिराने दवाखान्यात जात असल्याने योग्य उपचारांना उशीर होतो, त्यामुळे फॅमिली डॉक्टर्सनी काळजीपूर्वक तपासणी करताना कोविड लक्षणे ओळखून त्याप्रमाणे तत्काळ उपचार सुरु केल्यास वेळीच रुग्ण बरं होण्यास मदत होईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, घरच्या घरी विलगीकरणातील रुग्णांकडे आपण सर्व डॉक्टर्सनी लक्ष देणे, त्यांची विचारपूस करीत राहणे गरजेचे आहे, त्यामुळे रुग्णाला मानसिक आधारही मिळतो आणि त्याची तब्येत खालावत असेल तर वेळीच त्याला रुग्णालयात दाखल करणे शक्य होते असेही मुख्यमंत्री म्हणाले. यासाठी सर्व डॉक्टर्सनी घरी उपचार घेणाऱ्या रुग्णाला प्रोटोकॉलप्रमाणे उपचार मिळताहेत किंवा नाही याकडे व्यक्तिशः लक्ष द्यावे तसेच वॉर्ड अधिकाऱ्यांना देखील योग्य ती माहिती वेळोवेळी दिल्यास रुग्णांच्या बाबतीत पुढील व्यवस्थापन करणे पालिकेला सोपे जाईल. आपल्या परिसरातील कोविड उपचार केंद्र किंवा जम्बो केंद्रांना देखील आपल्या सेवेची गरज आहे हे लक्षात ठेवून खासगी डॉक्टर्सनी तिथेही आपली नावे नोंदवावी असे आव्हान करून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात सर्वत्रच उपचार पद्धतीत एकवाक्यता असणे फार महत्त्वाचे आहे.

राज्यात १२७० मेट्रिक टन ऑक्सिजन निर्माण केला जातो मात्र कोविडमुळे सध्या १७०० मेट्रिक टनापर्यंत आपली गरज वाढली आहे. आपण ऑक्सिजनच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनण्यासाठी कमी आणि दीर्घ काळासाठीचा आराखडा तयार केला असून त्यामुळे लवकरच राज्यांतर्गत ऑक्सिजनची वाढीव निर्मिती शक्य होईल अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, टास्क फोर्सचे डॉ.संजय ओक, डॉ.शशांक जोशी, डॉ.राहुल पंडित तसेच डॉ.तात्याराव लहाने यांनी कोविड काळातल्या उपचार पद्धतीवर डॉक्टर्सना मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले. स्टीरॉइड्सचा वापर किती प्रमाणात करावा, सहा मिनिटे वॉक टेस्टचे महत्त्व, ऑक्सिजनची गरज आहे ते नेमके कसे ओळखावे, बुरशीमुळे होणाऱ्या ‘म्यूकर मायकॉसिस’मध्ये काय उपचार करावेत, ऑक्सिजन पातळी धोकादायक स्थितीत आहे म्हणजे नेमके काय, रेमडेसिवीर कधी आणि किती वापरावे, व्हेंटीलेटरवरील रुग्णांची काळजी, रक्त शर्करा स्थिर राहण्याकडे कसे लक्ष द्यावे, कोविड झाल्यानंतरचा किती काळ देखरेख ठेवावी, कोविड झालेल्या रुग्णाने नेमकी कधी लस घ्यावी यावर मोलाचे मार्गदर्शन व शंका निरसन केले.

## पुण्यात विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ; माजी आमदारासह चौघांवर गुन्हा दाखल

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याप्रकरणी पुण्यातील माजी आमदार बाळासाहेब उर्फ चंद्रकांत शिवरकर आणि त्यांचा मुलगा माजी नगरसेवक अभिजित शिवरकर यांच्यासह चौघांविरुद्ध कौटुंबीक हिंसाचाराप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी शिवरकर यांची सून ३७ वर्षीय स्नेहा अभिजित शिवरकर यांनी वानवडी पोलिसांत फिर्याद दिली असून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी ३८ वर्षीय पती अभिजित शिवरकर, ६९ वर्षीय सासरे



बाळासाहेब शिवरकर, सासू कविता बाळासाहेब शिवरकर (वय ६६) आणि सोनाली सिद्धार्थ परदेशी (वय ४०) या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी पती अभिजित हे माजी नगरसेवक आहेत. या चारही जणाविरुद्ध भादंवि कलम ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये फिर्याद देण्यात आली आहे. मानसिक आणि शारीरिक छळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचं फिर्यादीनं आपल्या तक्रारीत म्हटलं आहे. वानवडी पोलिसांत या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे. फिर्यादीनं दिलेल्या तक्रारीनुसार, मागील दोन वर्षांपासून शिवरकर कुटुंबीय सून स्नेहा अभिजित शिवरकर यांचा मानसिक आणि शारीरिक छळ करत होते. त्याच बरोबर आरोपींनी पीडितेला जीवे मारण्याची धमकीही दिली असल्याचं तक्रारीत म्हटलं आहे.

## भारतीय सण समारंभातील चैतन्य वारली चित्राच्या माध्यमातून लोकांसमोर येऊ दे

**मुंबई (विशाल कारंडे)-** सध्याच्या अडचणीच्या काळात मनावर नैराश्य न येऊ देता आपल्या वारली चित्रातून घराच्या कंपाऊंड वॉलवर रामायणातील घटना प्रसंग साकारणाऱ्या अमरावतीच्या भाग्यश्री विनायक पटवर्धन हिच्याशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फोनवरून संवाद साधला आणि तिचे अभिनंदन केले. यावेळी बोलतांना रामायणाप्रमाणेच विविध भारतीय सणांचे चैतन्य आणि दिव्यत्व तुझ्या वारली चित्राच्या माध्यमातून चित्रित कर, त्याचे एक चांगले पुस्तक प्रकाशित करता येऊ शकेल असेही मुख्यमंत्री भाग्यश्रीला म्हणाले.

आपल्या चित्रकलेची दखल घेऊन स्वतः राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्याला फोन केल्याचा आनंद भाग्यश्रीच्या शब्दात मावत नव्हता. ती म्हणाली, आपले मुख्यमंत्री स्वतः उत्तम फोटोग्राफर आहेत हे माहित होते, त्यांनी काढलेले गड किल्ल्यांचे आणि वन्यजीवांचे फोटो मी स्वतः ही पाहिलेले आहेत. त्यांचे कलेवरचे प्रेम ही मला माहित आहे पण ते माझ्यासारख्या सामान्य कलाकाराला स्वतःहून फोन करतील, माझं अभिनंदन



करतील असं कधीच वाटलं नव्हते. मुख्यमंत्र्यांनी तिला भारतीय सण समारंभाची माहिती देणारे वारली चित्रे काढ, त्याचे उत्तम दर्जाचे फोटो घे, ते पुस्तकाच्या माध्यमातून लोकांसमोर आणता येईल असे म्हणून तिच्या कलेला प्रोत्साहन तर दिलेच परंतू या करोनाच्या अडचणीच्या काळात विनाकारण घराबाहेर पडू नको, स्वतःची, कुटुंबियांची काळजी घे असेही ते म्हणाले. त्यांचा वडिलकीचा आधार आणि त्यांनी दिलेली प्रेरणा माझ्यासाठी खुप मोलाची आहे,असेही भाग्यश्रीने म्हटले आहे. भाग्यश्री करोना काळाआधी पुण्यात ट्रॅव्हल फोटोग्राफी आणि इलेस्ट्रेशन आर्टिटस्ट म्हणून काम करत होती. करोनाच्या प्रादुर्भावानंतर ती अमरावतीला घरी परतली. मी स्वतः निस्सीम रामभक्त आहे, लहानपणापासून रामायण ऐकत, वाचत आणि पहात आले आहे त्यामुळे मला रामायणातील सगळे घटनाप्रसंग, त्यातील बारकावे माहित होते. टाळेबंदीच्या काळात मनाला शांती मिळण्यासाठी मी घराच्या कंपाऊंडवॉलवर श्रीरामाच्या जन्मापासून रावणाच्या वधापर्यंतचे प्रमुख घटनाप्रसंग वारली चित्राच्या माध्यमातून रेखाटले.

## राजेश टोपे अडचणीत? जालना जिल्ह्याला पुरवली अतिरिक्त लस

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** महाविकास आघाडी चे आणखी एक मंत्री अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. पूजा राठोड प्रकरणात वनमंत्री संजय राठोड यांना राजीनामा द्यावा लागल्यानंतर १०० कोटीची खंडणी वसूल करण्याच्या कथित प्रकरणात अनिल देशमूख यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यातच आता महाविकास आघाडीचे



आणखी एक मंत्री अडचणीत येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात दुसऱ्या लाटेत चांगल्या उपाययोजना केल्या म्हणून सर्वोच्च न्यायालयासह पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्य सरकारची स्तुती करत आहे. तसंच राज्यात देशात सर्वाधीक लसीकरण करण्यात आलं आहे. मात्र, या लसीकरणामध्ये आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आपलं होम टाऊन असलेल्या जिल्ह्याला सर्वाधिक लसी दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. त्यामुळं टोपे अडचणीत सापडण्याची चिन्हं आहेत. टोपे यांनी स्वतःच्या जिल्ह्यासाठी दरियादिली दाखवत दुसऱ्या जिल्ह्यांना वाऱ्यावर सोडलं का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होतो.दरम्यान भारत सरकार च्या स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्रालयाचे अप्पर सचिव विकास शील यांनी महाराष्ट्र च्या आरोग्य विभागाला पत्र पाठवलं आहे.

## नितीन गडकरींनी देवेंद्र फडणवीसांना झापले

**मुंबई (नितीन देवळेकर)-** मी परत येईल म्हणत सत्ताधाऱ्यांवर आक्रमकपणे तुटून पडणारे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय परिवहन मंत्री नितिन गडकरी यांनी चांगलेच झापले. कोरोना संकट ही वेळ राजकारणाची नसून कोरोना लाईटली घेऊ नका, असं स्पष्ट शब्दात गडकरींनी सुनावलं. मला काही होत नाही, म्हणणारे लोक जीवानिशी गेले. कोविडचा परिणाम हृदयावर आणि फुफ्फुसावर होत आहे. हे संकट सोपं आहे. मी हात जोडून देवेंद्र फडणवीस यांच्यासह सगळ्यांना विनंती



करतो. फडणवीस गडचिरोली चा दौरा केला. शक्यतो गाडीत जाताना किती लोक असतील याची दक्षता घ्या. बहुतेक सगळ्या चर्चा आता व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवर करा. कोरोना लाईटली घेऊ नका. पक्षाची कामं महत्त्वाची आहे, परंतु आता इथून पुढे काम घरून करा. आधी स्वतःची काळजी घ्या. पार्टीचे काम महत्त्वाची असली तर आपला जीव वाचला तर पुढे काम करता येणार आहे. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी ठेवा, सगळ्या ठिकाणी राजकारण करू नका. फुटकळ प्रसिद्धीच्या मागे लागू नका, अशा शब्दात गडकरींनी भाजपा कार्यकर्त्यांचे कान टोचले.

## बीकेसी लसीकरण केंद्रावर नागरिकांची अधिकाऱ्यांसोबत बाचाबाची, आज मिळणार फक्त ‘इतक्या’ लस

**मुंबई (राकेश गायकवाड )-** राज्यात एकीकडे करोना रुग्णांची संख्या वाढत आहे तर दुसरीकडे अपुऱ्या लसींमुळे वातावरण आणखी तापल्याचं दिसून येत आहे. आजही मुंबईत अनेक ठिकाणी लसीकरण केंद्रावर गोंधळ सुरू असल्याचं समोर येत आहे. आताच हाती आलेल्या माहितीनुसार, बीकेसी लसीकरण केंद्रावर मोठा गोंधळ झाल्याचं सांगण्यात येत आहे. शनिवारी टोकन दिलेल्या नागरिकांनी लसीसाठी गर्दी केली पण फक्त १ हजारच टोकन वाटणार असल्याची माहिती मिळताच नागरिकांनी मोठा संताप व्यक्त केला. भर उन्हात मोठ्या रांगा लावूनही लसीकरण होत नसल्यामुळे नागरिकांनी मनपा अधिकाऱ्यांसोबत बाचाबाची केली. शनिवारी टोकन दिलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. पण लसीकरणाचा तुटवडा असल्यामुळे बीकेसी केंद्रावर फक्त एक हजार लसी दिल्या



जाणार आहेत. यावेळी टोकनचा आता काही फायदा होणार नसल्याने नागरिक चांगलेच संतापले आहे. यावेळी अनेकांनी राज्य सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, एकीकडे लसीकरणाचा गोंधळ तर दुसरीकडे करोना रुग्णांची संख्या कमी होत आहे ही मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी आहे. मुंबईत करोनावर नियंत्रण मिळवण्यात यश येत असल्याचं चित्र आहे. मार्च- एप्रिलमध्ये करोना रुग्णांची दैनंदिन संख्या १० ते ११ हजारांवरुन आता थेट २ हजारांवर आली आहे. मुंबईत करोना लढ्याला यश मिळत असल्यानं मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबईत मार्च- एप्रिलमध्ये करोना रुग्णसंख्येनं उच्चांक गाठला होता. आता मात्र, करोना रुग्णसंख्येचा आलेख उतरताना दिसत आहे. १० ते ११ हजारांवर पोहचलेली रुग्णसंख्या आता आटोक्यात येत असल्यानं मोठा दिलासा मिळाला आहे. आज मुंबईत २ हजार ४०३ नवीन रुग्ण सापडले आहेत. तर, गेल्या २४ तासांत ३ हजार ३७५ रुग्णांनी करोनावर यशस्वी मात केली आहे.

## कोविडच्या वृत्तांचा अतिरेक थांबवण्याबाबतची याचिका फेटाळली

**औरंगाबाद (सतिश सोनावणे)-** वृत्त वाहिन्यांकडून कोविडविषयक वृत्तांचा होणारा अतिरेक थांबवण्याची विनंती करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. एस. व्ही. गंगापूरवाला आणि न्या. श्रीकांत डी. कुलकर्णी यांनी नुकतीच नामंजूर केली आहे. याचिका नामंजूर करताना न्यायालयाने म्हटले आहे की, सत्य आणि अचूक बातमी दाखवण्यापासून माध्यमांना प्रतिबंधित करता येत नाही. त्यामुळे ही याचिका खर्चासह फेटाळण्यात येते. येथील व्यापारी अमित कांतीकुमार जैन यांनी ॲड. कुलदीप कहाळेकर यांच्यामार्फत खंडपीठात ही जनहित याचिका दाखल केली होती. जैन यांच्या याचिकेनुसार हिंदी, मराठी, इंग्रजी माध्यमाच्या वृत्तवाहिन्यांमधून दिवसभरात किमान १२ तास करोनाविषयक बातम्या सतत दाखवण्यात येतात. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात आजाराविषयीची भीती वाढत जाते. शिवाय यामुळे कोविडविषयी गैरसमजही निर्माण होत आहेत. सतत स्मशानभूमीतील पेटत्या चिता, रुग्णालयाबाहेर रडणारे नातेवाईक हे दाखवले जात आहे. यामुळे नागरिकांचे विचार



नकारात्मक होतात, असे याचिकेत म्हटले आहे. न्यायालयाने याचिका फेटाळताना म्हटले आहे, की कोविडशी संबंधित खळबळजनक बातम्या दाखवण्यापासून माध्यमांना, दूरचित्रवाहिन्यांना प्रतिबंधित करा व त्याकरिता नियामक मंडळ स्थापन करा असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते परंतु आम्ही अशा याचिकेची जनहित याचिका म्हणून कल्पना करू शकत नाही.

## शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या तरुणीवर सामुहिक बलात्कार; कोविड उपचारादरम्यान पीडितेचा मृत्यु

**चंदीगड-** दिल्ली हरियाणा टिकरी सीमेवरील शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आलेल्या पश्चिम बंगालमधील एका सामाजिक कार्यकर्तीवर सामुहिक बलात्कार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांच्या तक्रारीनंतर हरियाणा पोलिसांनी दोन मुख्य आरोपींसह ६ जणांवर सामुहिक बलात्कार, विनयभंग यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याच्या तपासासाठी रविवारी विशेष तपास पथक तयार करण्यात आले असल्याचे बहादूरगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजयकुमार



यांनी सांगितले. याबाबत या तरुणीच्या वडिलांनी सांगितले की, ती १० एप्रिल रोजी बंगालहून टिकरीला जाण्यासाठी रेल्वेने निघाली होती. रेल्वे प्रवासात सहा आरोपींपैकी एकाने तिचा विनयभंग केला होता. तेव्हा तिने असे वर्तन पुन्हा न करण्याचा इशारा दिला होता. २५ एप्रिल दरम्यान तिला कोविडची लक्षणे दिसू लागल्याने या २५ वर्षाच्या तरुणीला झाज्जार जिल्ह्यातील बहादुरगड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान तिचा ३० एप्रिल रोजी मृत्यु झाला. या तरुणीने आपल्यावरील आपबिती आपल्या वडिलांना फोनवरुन कळविली होती.

## कोविड सेंटरमध्ये घुसून डॉक्टरांसह दोन परिचारिकांना मारहाण; कोरोनायोद्ध्यांची सुरक्षितता वाऱ्यावर

**पुणे (अकिल शेख)-** ‘तुम्ही आमच्या वडिलांवर व्यवस्थित औषधोपचार करीत नाही’, असे म्हणून कोविड सेंटरमध्ये घुसून कोरोना रुग्णावर उपचार करणाऱ्या डॉक्टर व दोन परिचारिका महिलांना मारहाण झाल्याची घटना पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील कोविड सेंटरमध्ये शनिवारी घडलीय.यातील डॉक्टर व परिचारकांस मारहाण करणाऱ्या सुनील चंद्रकांत रणखांबे, रवी चंद्रकांत रणखांबे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. डॉक्टर श्वेता संभाजी कोडग या उपजिल्हा रुग्णालयात कोविड सेंटरमध्ये




रुग्णांवर सेवा करीत असताना, रुग्ण चंद्रकांत चन्नाप्पा रणखांबेचे नातेवाईक सुनील व रवी रणखांबे यांनी कोविडच्या वार्ड ३ मध्ये जबरदस्ती प्रवेश केला. तुम्ही माझ्या वडिलांवर व्यवस्थित उपचार औषध उपचार करीत नाही म्हणून डॉक्टर कोडग यांचा हात पिळुन डाव्या गालावर चापट मारली. तसेच परिचारिका अंजली बिभीषण पवार व सोमय्या सत्तार बागवान यांना देखील हाताने मारहाण केली. यात पवार यांना अधिक दुखापत झाली आहे.

## लसीकरण धोरणात कोणत्याही न्यायालयीन हस्तक्षेपाची आवश्यकता नाही - केंद्र सरकार

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)–** देशातील कोरोनाचा वाढता प्रकोप पाहता या लढाईत आता सर्वोच्च न्यायालयाने देखील हस्तक्षेप केला आहे. केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालय लसीकरण आणि कोरोना समस्येवरून आमने-सामने आहेत. त्याचबरोबर केंद्र सरकारला फटकारत ऑक्सिजन आणि औषधांच्या पुरवठ्यासाठी १२ सदस्यीय टास्क फोर्सची न्यायालयाने स्थापना केली आहे. सर्वोच्च न्यायालयात गेल्या काही दिवसांपासून कोरोना परिस्थितीवर सुनावणी सुरु आहे. सुनावणी दरम्यान न्यायालयाने वारंवार केंद्र सरकारला फटकारले आहे. दरम्यान, कोरोना व्यवस्थापनाविषयी नवीन व सविस्तर



माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिली आहे. आज होणाऱ्या सुनावणीपूर्वी रविवारी संध्याकाळी २१८ पानांच्या प्रतिज्ञापत्रात केंद्र सरकारने न्यायालयाच्या सर्व प्रश्नांची सर्व उत्तरे दिली. दरम्यान, आपल्या लसीकरण धोरणाचा बचाव करण्याचा केंद्राने प्रयत्न केला. या प्रकरणात न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज नसल्याचे केंद्राने म्हटले आहे. तसेच देशभरात कोणताही रुग्ण कोठूनही रुग्णालयात दाखल होऊ शकतो, असे केंद्राने स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर कोविड सेंटर, बेड, डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात आल्याची माहितीही केंद्र सरकारने दिली आहे.

## पुढील तीन दिवसात देशात या भागात जोरदार वादळासह पाऊस, हवामान विभागाचा इशारा

**मुंबई (राकेश गायकवाड)-** देशात काही ठिकाणी आणि महाराष्ट्रात काही भागात पुढील तीन दिवसात पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. वादळासह जोरदार पाऊस कोसळेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसापासून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसना झाले आहे. बीडमध्ये नदीला पूर आला होता. तर कोकणात चिपळूण, संगमेश्वर येथेही दोन दिवसांपूर्वी मध्यम, तुरळक पाऊस झाला. देशात पश्चिम हिमालय आणि उत्तर भारतात पावसाचा अंदाज आहे. देशात ११ मे ते १३ मे या काळात पश्चिम हिमालय प्रदेशात अनेक ठिकाणी वादळ आणि वादळासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात वायव्य मैदानाच्या काही भागात पाऊस पडण्याची शक्यताही भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

नवीन वेस्टर्न डिस्टर्बन्स ११ मे पासून पश्चिम हिमालयीय प्रदेश आणि उत्तर-पश्चिम भारतातील मैदानी भागावर परिणाम करेल. अरबी समुद्रावरुन निम्न स्तरावरील



वारे आणि ओलावा येण्यामुळे पश्चिम बंगालच्या हिमालयीन भागाच्या बऱ्याच भागात हा पाऊस होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर वायव्य भारतातील मैदानाच्या काही भागातही वादळासह पाऊस पडेल. या काळात, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागात १२ आणि १३ मे रोजी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिणेकडून निम्न स्तरावरील वारे येत असल्याने आणि पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्याशी संपर्क येणार असल्याने ईशान्येकडील राज्ये आणि पश्चिम बंगालमध्ये पावसाची शक्यता आहे. यासह, पुढच्या ४-५ दिवसांत पूर्वेकडील काही भागात वादळी वादळासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.